Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 406 – 410
DOI: 10.5281/zenodo.10130197

Original Research Article

# महात्मा गांधी आणि गाडगे महाराज समाजक्रांतीचे अग्रदुत

जगन्नाथ विठ्ठलराव कदम

संशोधक विद्यार्थी, एम.ए. (तत्वज्ञान) सेट

*Corresponding author E-mail*: jvk488@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

परीवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. काळ कुठलाही असो समाजात त्या-त्या वेळी अनेक समस्या असतात. जेव्हा समाजजीवनाचा तोल ढळतो, तत्वांना ग्लानी येते, नीतीचा विपर्यास होतो आणि माणसांचा पशु होतो. तेव्हा समाजाला सावरणारा कोणीतरी महात्मा प्रगट होतो. ते बुध्द असतील, ख्रिस्त, सॉक्रेटीस, किंवा गांधी, फुले, आंबेडकर तसेच अनेक संत असतील. ह्यांनी त्या-त्या वेळी समाजातील दुर्गूण आणि दोष ओळखुन समाजाला दिशा आणि नवी चेतना देण्याचे कार्य केले आहे.

अशाच महात्म्यांमध्ये म.गांधी व संत गाडगे महाराज यांचा समावेश होतो. म. गांधींचा जन्म ०२ आक्टोंबर १८६९ तर संत गाडगे महाराजांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी झाला. दोघेही समकालीन होते. समाजात असलेली विषमता, शोषण, अज्ञान आणि अनेक माणुसकीला काळीमा फासणाऱ्या रूढी, प्रथा आणि परंपरा यातुन समाजाला बाहेर काढुण विज्ञानवादी दृष्टीकोन दिला. समतेच्या निकोप वातावरणाची समाजाला नवी दिशा निर्माण करून दिली. यांच्या कार्याचा वेध प्रस्तुत लेखात घेण्यात आला आहे.

## सामाजिक जाणिवेतुन कार्याला सुरूवात

समाजात अनेक समस्या असतात त्या सोडवण्यासाठी ह्या महापुरूषांनी अहोरात्र प्रयत्न करून अन्याय अत्याचाराविरूध्द ऊभे राहून त्याच्याशी दोन हात केले. द. आफ्रिकेत असतेवेळी त्याठिकाणी गोऱ्या लोकांनी काळया लोकांवर चालविलेल्या अत्याचाराचा अनुभव खुद्द महात्मा गांधींना आला. त्याठिकाणी त्यांनी अहिंसक मार्गाने सत्याग्रहास सुरुवात केली. "नाताळ इंडियन काँग्रेस" या नावाची संस्था स्थापन करुन सर्व भारतीयांना एका छताखाली आणले. येथुनच त्यांचे क्रांतिकारी रुप साकार झाले. गाडगे महाराजांच्या बाबतीत तर दारिद्रय, व्यसनी उपद्रव, सावकारशाहीचा जाच, अज्ञान आणि अनेक देवधर्मासंबंधी भोळया समजुतींनी कुटूंब मेटाकुटीस आले होते. लक्ष्मीवंत व उच्चभ्रु लोकांचे दीनदुबळया समाजावर होत असलेले अन्याय जणू गाडगे महाराजांना क्रांती करण्यासाठि बालपणीच

घणाचे घाव घालीत होते. लोकांना या संकटातुन बाहेर काढण्यासाठी असलेला कळवळा व अन्याय, अत्याचाराविरुध्द पेटुन उभे राहण्याची आत्मप्रेरणा या दोन्ही गोष्टींचा संगम होऊन हे दोन्ही दयाशील महापुरुष क्रांतिशील महापुरुष बनले.

**अस्पृश्यता निवारण**

उच्चनीच भावावर आधारलेला जातिभेद नष्ट व्हावा व अस्पृश्यतामुक्ती व्हावी, सर्व मानव बंधुभावाने वागावेत व सामाजिक समता प्रस्थापित व्हावी यासाठी या महात्म्यांनी आपले सर्व जीवन पणास लावले. "अस्पृश्यता अधर्म आहे हे आंधळासुध्दा पाहु शकेल. जात ही अस्पृश्यतेप्रमाणे हिंदु धर्मावर माजलेले बांडगुळ आहे. अस्पृश्यता चालू राहिल्याने आज हिंदुधर्माचा ऱ्हास होत चालेला मला दिसुन येत आहे. या गोष्टीमुळे हिंदुधर्म फुटून विस्कळित होण्याच्या ज्या क्रियेतून मंदगतीने जात आहे ती इतकी गतिमान होईल की कार्यकर्त्यांना ती आवरणे फारच कठीण होईल. आपण सगळे एकाच भारतीय कुटूंबातील आणि पुढे जाऊन एका मानव कुटूंबातील मुले का होऊ नये." गांधीजींची ही वचने उद्बोधक आहेत. एवढेच नाहीतर गांधीजी म्हणत "मला पुनर्जन्म नको आहे पण तो मला येणारच असेल तर तो अस्पृश्याचा यावा. त्यायोगे त्यांच्या वाटयाला येणारी दु:खे व यातना यांचा अनुभव मला घेता येईल. मला अनुभव आला म्हणजे मी मला व इतर अस्पृश्यांना त्या दुर्दशेतुन सोडविण्याच्या प्रयत्नास लागेन. म्हणुन मी ईश्वराची प्रार्थना करतो की, देवा मला पुन: जन्म मिळणार असेल तर तो ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शुद्र यांचा नको, तर अतिशुद्राचा दे". गाडगे महाराजांची तीच धारणा होती. महाराज म्हणत असत, "आपल्या हिंदुस्थानला मोठा डाग आहे डाग. तो डाग कोणता? शिवशीऽल ! काय करशील! शिवशीऽल ! कोणी तुम्हास जात विचारील, तु कोण? जो जात पुसते त्याच्यासारखाच  हा आहे का नाही? याले चार हात अन् त्याले दिड हात आहे का? याले दोन डोळे अन् त्याला चार डोळे आहेत का? सर्वांच रक्तमांस एक, सर्वांचा नियंता एक. मग ही जात आली कुठून. कोणी तुम्हास जात विचारील, तु कोण? म्हणाव मी माणुस! बाई आणि पुरूष या दोनच जाती आहेत. तिसरी जातच नाही. सरळ शहाणे व्हा अन् शिवाशिव काढा. सरळ शहाणे व्हा अन् माणूसपणा पैदा करा!" गांधीजींचा आणि गाडगे महाराजांचा धर्म म्हणजे अध्यात्म भक्तीवर आधारलेला मानवधर्म. दोघांच्याही मनात अस्पृयांबद्दल कीव आणि अस्पृश्यता निवारण्यासाठी कळवळा होता.

**ग्रामस्वराज**

भारत कृषिप्रधान देश म्हणुन ओळखला जातो. इंग्रजांनी येथील खेडयात मिळणारा कच्चा माल विलायतेत घेवून जाणे व त्याचा पक्का माल करुण पुन्हा तो भारतीय बाजारपेठेत विकणे यातुन ग्राम स्तरावर छोटे-मोठे उद्योगधंदे होते त्यांच्यावर परीणाम होऊ लागला. लोक शहराकडे पलायन करू लागले. खेडयाची आर्थिक अवस्था उद्ध्वस्त होऊ लागली, शेतकरी कर्जबाजारी होत होता, व्यापारी, दलाल हे सावकारी करु लागले हे ओळखुन गांधीजींनी स्वदेशीचा व खेडयाकडे चला असा संदेश लोकांना दिला. जर खेडी स्वयंपुर्ण राहिली तर भारत स्वयंपुर्ण व सशक्त राहिल हे गांधीजींनी ओळखले होते. अशाच स्वरुपाचे कार्य संत गाडगे महाराजांनीही केले. दिवसा सगळा गाव झाडुन स्वच्छ करायचा आणि रात्री कीर्तनाच्या माध्यमातुन लोकांच्या मनातील जळमट विचार बाजुला सारायचे. कीर्तनातुन ते लोकांना समजेल अशा भाषेतुन सांगायचे देवाचा कोप नसतो, देवाला नवस करु नका, गाव स्वच्छ ठेवला तर रोगराई जाते व गावात  आरोग्य नांदते,सावकाराचे कर्ज काढु नका, आपल्या शेतीची आणि गुरा-ढोरांची काळजी घ्या, आपल्या लेकरांना शिक्षण द्या. असा संदेश त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत दिला.

**दया व परोपकार**

समाजात असे अनेक अंध, पंगु, महारोगी आणि उपेक्षित होते. महारोग्याच्या सावलीला सुध्दा उभे राहु नये अशी भीती त्यावेळी होती. अशा महारोग्यांना सुध्दा आपले माणण्याचे कार्य या दोन महापुरुषांनी केले. त्यांच्यावर दया आणि परोपकार करुण त्यांच्या जीवनात सुखाचे दिवस आणले. गांधीजींनी स्वत: कुष्ठरोगी पाहून त्याची शुश्रुषा केली हे

प्रसिध्दच आहे. या प्रवृत्तीबद्दल गांधीजी म्हणतात “कर्तव्यनिष्ठेप्रमाणेच शुश्रुषेचा गुणही माझ्यामध्ये स्वभावत: होता. आजारी माणुस नातेवाईक असो की परका असो, त्याची सेवा करण्याचा मला षोक होता. शुश्रुषेबद्दलच्या ह्या माझ्या षोकाने पुढे पुढे विशाल रुप धारण केले. इतके की त्याकरीता मी आपला धंदाही बाजुला ठेवीतअसे. माझ्या धर्मपत्नीला व घरच्या इतर मंडळींनाही मी त्यात गुंतवीत असे. या वृत्तीला मी षोक असे नाव दिले आहे. कारण माझी अशी खात्री झाली की, या सत्कर्मापासुन स्वत:ला आनंद होत असेल तरच त्याचे चीज होते. ज्या सेवेमध्ये आनंद वाटत नाही तिच्यापासुन सेवकाला लाभ होत नाही, आणि सेवा घेणाऱ्यालाही सुख वाटत नाही. ज्या सेवेत आनंद वाटतो तिच्यापुढे ऐषआराम किंवा द्रव्यार्जन वगैरे गोष्टी तुच्छ वाटु लागतात.” संत गाडगे महाराजांचे कार्य गांधीजींच्या अगोदर पासुनच सुरू होते. त्यांनी अनेक उपेक्षितांसाठी सदावर्त, धर्मशाळा, काढल्या होत्या. भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी, उघडया नागडयाले वस्त्र, बेघराले आसरा, अंध पंगु रोग्याले औषध द्या असे महाराज नेहमी सांगत. "गरीबासाठी एका भाकरीचे सदावर्त चालवा," असा महाराजांचा आग्रह असे. गोरगरीब माणसांवर दया करण्याचा मार्ग हाच खरा देवाच्या भक्तीचा मार्ग आहे हा विचार संत कबीरापासून महाराजांनी घेतला. महाराज आपल्या कीर्तनात सतत सांगत असत की,

**'कबीर कहे कमालकू दो बातें लिख लें ।**

**कर साहबकी बंदगी और भूखेकू कुछ दे ।।**

**पशुहत्या बंदी**

संतवचनानुसार गाडगे महाराज आणि गांधीजी महासंत होते. दयेला सेवेचे आणि अहिंसेला सत्याग्रहाचे रूप घेऊन या दोन्ही महासंतांनी समाजात मानवधर्म संस्थापनेची महान कामगिरी केली. धर्मरूढीच्या नावावर काही ठिकाणी देवीला बकरे बळी देण्याची पद्धती होती. देवधर्माचे नाव सांगावयाचे आणि दैत्यालाही । लाजविणाऱ्या क्रूरतेने बकऱ्यांना कापावयाचे, या आसुरी प्रवृत्तीवर गाडगे महाराजांनी हल्ला चढविला आणि सत्याग्रही प्रवृत्तीने आत्मशक्ती पणास लावून हे अघोरी प्रकार बंद केले. “असा कसा तुमचा देव ! घेतो दुसऱ्याचा जीव ! " हा गाडगे- ? महाराजांचा सवाल म्हणजे क्रांतिकारक दयाधर्माची नांदी होय. गोरक्षणाच्या बाबत महाराजांनी फार मोठी कामगिरी केली. गुरे म्हातारी झाली की शेतकरी ती बाजारात कसायाला विकीत असे हे महाराजांच्या मनी फार सलत असे. ते म्हणत, “पाहावा ! गायीसारखं उपयोगी जनावर दुसरे नाही. आईबाप म्हातारे झाले तर आपण त्यांना बाजारात विकतो का ?" असा मर्मभेदी सवाल करून म्हाताऱ्या गायीबैलाच्या रक्षणाचा विचार ते मांडीत असत. गांधीजींचे गोरक्षणकार्य प्रसिद्धच आहे. 'गोरक्षण ही मला मानवाच्या सबंध विकासक्रमात सर्वांत अलौकिक अशी गोष्ट भासते. गायीचा अर्थ मी मानवाच्या खालची सगळी मूक दुनिया असा करतो. गायीचे निमित्त करून त्या तत्त्वांच्या द्वारा मनुष्याला सबंध चेतनसृष्टीशी आत्मीयतेचा अनुभव करायला लावण्याचा त्यात प्रयत्न आहे. असा देवता भाव गायीलाच का देण्यात आला, तर त्याचे कारण ती भारताची कामधेनू आहे. ती दूधच देते असे नव्हे तर सगळया शेतीचा गाय ही आधारस्तंभ होय." महात्मा गांधीजींचे हे विचार मननीय आहेत. गाडगे महाराजांनी आपल्या आध्यात्मिक साक्षात्काराच्या जोरावर सर्व चेतनसृष्टीशी आत्मीयता साधण्याची साक्ष जनता जनार्दनास पटविली.

**ईश्वर संकल्पना**

अध्यात्मविद्या सांगते की परमात्मतत्त्व ही पाहावयाची वस्तू नाही, अनुभवायची वस्तु आहे. गांधीजींनी हे परमात्मतत्त्व सर्व प्राणिमात्रात व्यापून राहिले आहे या ईशोपनिषदाच्या तत्त्वज्ञानाचे स्वतः दर्शन, आचरण करून दाखविले. गाडगे महाराजांनी हे अध्यात्म सोप्या भाषेत लोकांना पटवुन दिले. “मानसाच्या जल्मात आल्यावर काय करावं

? पैसा कमवावा का बायकापोरांना पोसून मरावं ? जो घर-दार, बायकापोर यांचा विचार करतात त्यांना खटाऱ्याचा बैल म्हणावं. मानसाच्या जल्मात येऊन जो देवाचे भजन करील, तुकोबा म्हणतात, तो देव होईल. ते म्हणतात मी शेतकऱ्याचा मुलगा. मला देव दिसला नाही. मीच देव झालो. देव पाह्याची वस्तू नाही अन् तो कोनाला दिसणार नाही. मात्र त्याचे भजन केल्याने माणूस देव होतो." गाडगेबाबांच्या या उद्गारावरून या ईश्वरप्राप्तीचे साधन म्हणजे भजन होय. आणि हे भक्तिप्रेम सर्व ठिकाणी ईश्वर असलेल्या सर्व भूतमात्रावर प्रेम हेच गाडगे महाराज व गांधीजी यांच्या शिकवणुकीचे सार आहे. गाडगे महाराज जन हे जनार्दन हाच सिद्धान्त लोकमानसावर बिंबवीत. दोघांनीही दरिद्रनारायण हेच उपास्य दैवत मानले. इतकेच नव्हे तर दरिद्री नारायणाच्या शांतिशील व क्रांतिशील भक्तीचा एक आदर्श जगासमोर ठेवला.

**शिक्षणविषयक विचार**

गांधीजींच्या मते, प्रत्येक व्यक्तीला सुंस्कृत व चारित्र्यसंपन्न बनविण्याचा सोपा मार्ग म्हणजे शिक्षण होय. शरीर, बुध्दी, ऱ्हदय यांचा समतोल विकास साधणारे शिक्षण हे प्रभावी माध्यम होय. हृदयाचे शिक्षण हेच खरे शिक्षण. हृदयात शुद्ध प्रेम प्रकट झाले तर बाकीसर्व आपोआप प्राप्त होईल. "शिक्षण केवळ कॉलेजात गेल्यानेच मिळू शकते असे मानणे ही एक अंधश्रद्धा आहे. शाळाकॉलेजे नव्हती तेव्हाही जगाने हजारो तेजस्वी विद्यार्थ्यांना जन्म दिलाच होता. आपणांपैकी अनेकजण शाळाकॉलेजांत जाऊन निरर्थक ज्ञानाचे संग्राहक बनत आहेत. सत्त्व बाजूला राहते आणि भुसकट ग्रहण केले जाते. शाळा-कॉलेजांची नालस्ती करावी हा माझा हेतू नाही. त्याचाही उपयोग आहेच, पण आपण त्यांना वाजवीपेक्षा अधिक महत्त्व देत आहोत. ज्ञानप्राप्तीच्या अनेक साधनांपैकीच ते एक साधन आहे." विद्यार्थ्यांचे चारिव्यसंवर्धन हे शाळेचे मुख्य ध्येय आहे. शिक्षण हे काही साध्य नव्हे, ते एक साधन आहे. ज्या शिक्षणाने आपण चारित्र्यवान बनू तेच खरे शिक्षण." १९३७ साली भारताच्या वेगवेगळया प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळे अस्तित्वात आल्यावर अशा प्रकारचा विचार घडवून आणण्याची संधी गांधीजींना मिळाली. त्या वर्षी ऑक्टोबर महिन्याच्या २२ व २३ या तारखांना वर्धा येथे भारतातील शिक्षणतज्ज्ञांची परिषद बोलावून गांधीजींनी त्यांच्यापुढे आपली शिक्षणविषयक योजना मांडली. या योजनेलाच पुढे 'वर्धा योजना', 'वर्धा शिक्षण', 'मूलोद्योगी शिक्षण', 'बुनियादी शिक्षा', 'नयी तालीम', 'बेसिक शिक्षण' व अखेर 'जीवन शिक्षण' अशी अनेक नावे प्राप्त झाली.

गाडगे महाराज अशिक्षीत होते परंतु त्यांनी शिक्षणाचे महत्व ओळखले होते. ते नेहमी आपल्या कीर्तनातुन लोकांना सांगत “आपल्या मुला-बाळाले शाळेत घाला, त्याला शिकवा, शिक्षणासाठी जेवायच ताट मोडा आणि हातावर घेवून भाकरी खा. बायकोले लुगड कमी भावच घ्या. इव्हायाला पाहुणचार करु नका. पण मुलाले शाळेत घातल्याविण सोडु नका. विद्या मोठ धन आहे. यातलेच माणस दिल्लीच्या तक्तावर भाषण करतात. ज्याले विद्या नाही ती माणस बोरीबंदच्या ठेसनावर पोते उचलतात.” समाजाच्या उत्थानाकरीता शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे या महापुरूषांनी जाणले होते.

**समारोप**

दोन्ही महापुरूषांनी आपल्या आचरणातुन जगाला महानतेचा संदेश दिला. दोघांनीही अनेक संस्था उभ्या कल्या, इतकेच नव्हे तर सार्वजनिक संस्था कशा चालवाव्यात याचा आदर्श घालून दिला. संस्था आपल्या नेतृत्वाखाली चालली तरी आपण कमलपत्राप्रमाणे अलिप्त कसे राहावे याचे अलौकिक प्रात्यक्षिक विदेही जनक राजाप्रमाणे या दोन्ही महापुरुषांनी प्रत्यक्ष आचरण करून दाखविले. निःस्पृहता, चोख हिशोब, मालमत्ता ही आपली नसून जनता जनार्दनाची आहे याची जागरूक जाणीव त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत ठेवली. शिक्षण, शिस्त, शील यांचा त्रिवेणी संगम त्यांनी

सार्वजनिक-! संस्था कार्यात करून दाखविला. सेनापतीची कर्तव्यकठोरता, आणि मातेची कोमल वत्सलता, व्यापाऱ्यांनाही लाजविणारी व्यवहारचतुरता आणि योग पुरुषालाही लाजविणारी निःस्पृहता, नेत्यांनाही लाजविणारा लोकसंग्रह आणि साधूंनाही लाजविणारा अनाग्रह इत्यादी गुणसंपदेमुळे हे दोन्ही महापुरुष साधुत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व यांचा त्रिवेणी संगम साधणाऱ्या मानवांच्या महाविभूतीच होत. त्यांच्या कार्यातुन कृतिशीलता आणि समाजाबद्दल असलेली अत्यंतीक तळमळ आपल्याला दिसुन येते. त्यांच्या प्रेरणा घेऊन साक्षात्कारी संतसाधू होता न आले तरी परोपकारी बनावे असा प्रयत्न आपण केला तर त्यांच्या ऋणातून आपण उतराई होऊ.

**संदर्भ सूची**


१) दांडेकर गो.नी. 'श्री गाडगेमहाराज' वीणा विजय देव, मृण्मयी प्रकाशन,३०२, 'मानसी' ६८, तुळशीबागवाले वसाहत, पुणे. मार्च २०२०

२) भगत रा. तु. "संत गाडगेबाबांचा संदेश" चैतन्य प्रकाशन, १७५८,ए,अनिरूध्द अपार्टमेंट, साकोली कॉर्नर,कोल्हापूर. १७ जुन १९९६

३) रसाळे उध्दव 'मानवतेचे पुजारी संत गाडगेबाबा', विद्याभारती प्रकाशन, गीतांजली मार्केट जवळ, मेन रोड,लातुर.

४) प्रबोधनकार ठाकरे संत श्री गाडगे महाराज, संपादक,गंगाधर बनबरे, जिजाई प्रकाशन, ५८४, नारायण पेठ, कन्याशाळा बसस्टॉप, जिजापुर, पुणे. २०१०

५) राठी शुभांगी "भारतीय राजकीय विचारवंत" कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद. ऑगस्ट २०१६

६) कुंभार नागोराव " महात्महा गांधी : विचार दर्शन, सौ. प्रेमा कुंभार, प्रगती मुद्रणालय, शिवनगर, लातूर.डिसेंबर १९९५

७) कुंभार नागोराव "महात्महा गांधीजींचे सामाजिक तत्वज्ञान" अरूणा प्रकाशन, १०३, ओंकार कॉम्पलेक्स-ए, खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर.आक्टोंबर २०१२

८) भोळे लक्ष्मण भास्कर "भारतीय राजकीय विचारवंत" पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, ८५ कॅनाल रोड, रामदासपेठ, नागपुर. जुन १९९५